Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

# हैं तय्यार हम...




**यंग रनर ग्रुप...** डावीकडून उजवीकडे भगवान मगर, अविनाश कुलकर्णी, सुधीर कुलकर्णी, बालाजी नायगुडे, जयंत खरोटे, चंद्रशेखर दाधीच, साहेबराव खटाणे, दयानंद कांबळे (कोच), मधुकर जाधव, संतोष धोटे, राजेंद्र इंगळे, किशोर देसले, बेबी सिंग.




**किड्स कॅपीटल इंग्लिश स्कूल ग्रुप...** डावीकडून उजवीकडे पिटर चंदनशिव, स्वाती उराडे, सुरेखा शिंदे, सविता वाघ, वैशाली पाटील, विद्या कुमठेकर, अश्विनी डावकरे, विजय वाडकर, संचालक मानसी वाडकर, वैशाली कुलकर्णी, सरिता राजपुत, आम्रपाली कस्तुरे, प्रतिक्षा जाधव, किरण परदेशी.

## ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

**स्पर्धा**
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

# बल्लाळ सर्वांत स्टायलिश खलनायक !

आजपर्यंत खलनायक म्हणजे धिप्पाड, पोट सुटलेला, दाढी-मिशा असलेला अशी काहीशी इमेज निर्माण झाली आहे. मात्र, एका मालिकेने या समजाला छेद दिला आहे. या मालिकेतील बलवंत बल्लाळ हा मराठी मालिकांमधील सर्वांत स्टायलिश खलनायक आहे. अभिनेता अशोक शिंदे यांची व्यक्तिरेखा बलवंत बल्लाळ प्रेक्षकांची दाद मिळवत आहे. मुळात बलवंत बल्लाळ या व्यक्तिरेखेचा एका मालिकेतील प्रवेशच २०० भागांनंतर झाला. मात्र, अल्पावधीतच आपल्या स्टाईल कोशंटमुळे बलवंत बल्लाळ लोकप्रिय झाला. अगदी वेशभूषेपासून ते त्याच्या वागण्या-बोलण्यात असलेली सहजता त्याचे वेगळेपण अधोरेखित करत आहे. हावभाव, हसणं, उठण्या-बसण्याच्या पद्धती यांतून ही व्यक्तिरेखा वेगळी ठरत गेली. 'कुठलीही भूमिका माझ्याकडे आल्यानंतर ती सकारात्मक आहे की नकारात्मक याचा मी पहिल्यांदा विचार करतो. त्यानुसार बलवंत बल्लाळचाही विचार केला. मात्र, ही भूमिका काहीशी वेगळ्या पद्धतीने साकारावी, असे मला वाटत होते. त्यामुळे दिग्दर्शकाशी चर्चा करून काही लकबी ठरवल्या. त्याचे वावरणे, त्याचे कपडे हे खलनायकापेक्षा अँटी-हिरो म्हणून उठून दिसतात. त्यामुळे या व्यक्तिरेखेला एक ग्रेस मिळाली आणि हा खलनायक स्टायलिश झाला, जो कधीच टेलिव्हिजनवर पाहायला मिळाला नव्हता,' असे अशोक शिंदे यांनी सांगितले.



# बंदगीच्या आई-वडिलांना घरमालकाने काढले घराबाहेर !



एका रिॲलिटी शोच्या घरात अगदी खुल्लम खुल्ला प्यार करीत असलेल्या बंदगी कालरा आणि पुनीश शर्माचा रोमान्स सध्या बाहेरच्या दुनियेत चांगलाच चर्चिला जात आहे. दोघांचा हा रोमान्स बघून बंदगीच्या आई-वडिलांना घरमालकाने घराबाहेर काढले आहे. हा एक असा रिॲलिटी शो आहे, ज्यामध्ये प्रत्येक स्पर्धक आपल्या आपल्या माइंड लेव्हलनुसार हा गेम खेळतो. मात्र, यंदाचा सिजन खूपच खालच्या स्तरावर खेळला जात असल्याचे दिसून येत आहे. होय, घरात स्पर्धक म्हणून असलेले पुनीश शर्मा आणि बंदगी कालरा हे दोघे ज्या पद्धतीने अश्लीलपणा करीत आहेत, त्यावरून हा शो परिवाराने बघू नये, असे म्हटले तर चुकीचे ठरू नये. कारण ज्या पद्धतीने बंदगी आणि पुनीश कुठलीही परवा न करता घरात खुल्लम खुल्ला अश्लीलपणा करीत आहेत, त्यावरून बाहेरच्या दुनियेत एकच खळबळ उडाली आहे. बंदगीचा हा खुल्लम खुल्ला प्यार बघून तिच्या वडिलांची प्रकृती खालावली आहे.

# मितांशची मालिकेत धम्माल !



टीव्ही जगतात गोकुळधाम सोसायटीतील मजा मस्ती प्रेक्षकांना अनुभवायला नेहमीच आवडते. आता या मजा मस्तीमध्ये चाईल्ड ॲक्टर मितांश गेरा येणार असून कॉमेडी दुप्पटीने बघायला मिळणार आहे. तो चिंटूच्या भूमिकेत दिसणार असून त्याची आई पूजा (गरिमा गोयल) ही जेठालालच्या दुकानात आणून सोडते आणि गायब होते. त्याला सांभाळण्याची जबाबदारी मग बागा आणि नट्टू काकावर येते. त्यानंतर जेठालाल पण त्याला सांभाळण्यात व्यस्त होतात. त्याच्यासोबत खेळता खेळता सर्वजण स्टिकी डार्टचा खेळ खेळायला लागतात.



## पालकांच्या आग्रहास्तव सिडकोत शाखा

गुरुकुलची शाखा सध्या बीड बायपास आणि पदमपुरा भागात आहे. स्थानिक विद्यार्थ्यांचा विचार करून आणि पालकांच्या आग्रहास्तव गुरुकुलचे प्रदीप गिरी यांनी सिडको भागातही गुरुकुलची नवीन शाखा सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. लवकर सिडको भागात गुरुकुलच्या नव्या शाखेची सुरुवात करण्यात येणार आहे.



# शिक्षणासह संस्काराचे माहेरघर गुरुकुल

इंजिनिअरिंग आणि मेडिकल प्रवेश परीक्षेसाठीचा मोठा ब्रँड म्हणून मराठवाड्यात आज गुरुकुल क्लासेसची ओळख निर्माण झाली आहे. आपल्या सातत्यपूर्ण अशा उत्तुंग निकालाने गुरुकुल क्लासेसने मराठवाड्यातील टॉपटेन क्लासेसच्या यादीमध्ये आपले नाव अग्रक्रमाने नोंदविले आहे. गुरुकुलमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना फक्त शिक्षणाचेच नव्हे तर चांगल्या संस्काराचेही धडे दिले जातात. अशा प्रकारचे क्लासेस कदाचित फक्त भारतातच असेल. यामुळे पालकांचा विश्वास गुरुकुलवर वाढतच चालला असून, गुरुकुलमध्ये प्रवेश मिळावा यासाठी विद्यार्थ्यांसह पालकवर्ग धडपड करीत आहे. त्याचप्रमाणे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांचे देशाच्या सर्वोच्च इंजिनिअरिंग शिक्षण संस्थेत शिकण्याचे स्वप्न सत्यात उतरु शकते हा विश्वास संचालक प्रा. प्रदीप गिरी यांनी 'गुरुकुल क्लासेस - आयआयटी डिव्हिजन'द्वारे निर्माण केला. प्रा. प्रदीप गिरी आणि इतर शिक्षकवृंदांनी प्रत्येक विद्यार्थ्यावर मेहनत घेऊन त्यांना यशस्वी मार्गक्रमण करण्यासाठी मार्गदर्शन करतात.




## डिसेंबर महिन्यात होणार प्रवेश चाचणी

जेईई (ॲडव्हान्स/ मेन्स) नीट बॅचेस (दहावी) साठी आणि फाऊंडेशन कोर्समध्ये (सातवी ते नववी) प्रवेश मिळविण्यासाठी गेट २०१८ ही स्कॉलरशिपवजा प्रवेश परीक्षा घेण्यात येते. गेट -२०१८ यंदा ही परीक्षा ३ डिसेंबर रोजी १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी देवगिरी महाविद्यालयात आणि १७ डिसेंबर रोजी सातवी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी गुरुकुल क्लासेस, बीड बायपास, देवळाई चौक येथे होणार आहे. या परीक्षेत गुणवत्तेनुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांना १०० टक्क्यांपर्यंत स्कॉलरशिप देण्यात येते. परीक्षेत नावनोंदणी करण्यासाठी ९६९९९६९३९२ या क्रमांकावर मिस्ड कॉल द्यावा.

## गुरुकुलने ठेवला एक आदर्श

गुरुकुलने प्रत्येक विद्यार्थ्याची निवड कठोर परीक्षेनंतर केली जाते. यासोबतच शिक्षणात रस असलेल्या मात्र पैशांअभावी शिक्षण घेऊ न शकणाऱ्या गरजू व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या १० मुलांना गुरुकुलतर्फे मोफत शिक्षण देण्यात येते. या कार्याबद्दल नाम फाऊंडेशनच्या वतीने गुरुकुलचे स्वागतही करण्यात आले आहे.

## बाहेरगावाहून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेलची सुविधा

संपूर्ण महाराष्ट्रातून विद्यार्थी गुरुकुलमध्ये येतात. बाहेरगावाहून आलेल्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी गुरुकुलतर्फे अद्ययावत हॉस्टेल सुरू करण्यात आले आहे. प्रत्येक रूमला स्वतंत्र बाथरूम जोडलेले आहे. आंघोळीसाठी गरम पाणी, आरओ फिल्टर केलेले शुद्ध पाणी, सुसज्ज ग्रंथालय आणि रीडिंग रूम आणि रुचकर जेवणाची व्यवस्था, अशा सुविधा येथे आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष ठेवले जाते. देवळाई चौक बायपास येथे मुल व मुलींसाठी स्वतंत्र वस्तीगृह (हॉस्टेल) ची सुविधा आहे.

## गुरुकुलमध्ये अभ्यास, घरी फक्त सुट्टी

गुरुकुलच्या सुनियोजित वेळापत्रकामुळे विद्यार्थ्यांना घरी अभ्यास करण्याची आवश्यकताच नाही. सायंकाळी ७ नंतर घरी गेल्यास पालकसुद्धा आपल्या दिवसभराच्या व्यापातून मुक्त होऊन मुलांना वेळ देऊ शकतात. मुलांनीही त्यांचा अभ्यास पूर्ण केल्याने पालकही त्यांना अभ्यासाचा हट्ट धरणार नाहीत. यातून पालक व मुलांच्या मैत्रीपूर्ण नात्याची विण तयार होईल व हेच या संकल्पनेचे यश आहे.

## गुरुकुलचे स्कूल लवकरच सुरु होणार

गुरुकुलमध्ये आपल्या पाल्यांना शिकता यावे म्हणून पालकही मोठे परिश्रम घेतात. मात्र निवड चाचणीत उत्तीर्ण न झाल्याने गुरुकुलमध्ये प्रवेश मिळत नाही. यासाठी गुरुकुलने पहिली ते सातवी अशी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. लहानपणापासूनच विद्यार्थ्यांना येथे चांगले व सुसंस्कृत शिक्षण मिळणार आहे.




## मनोधैर्य उंचावणारे मार्गदर्शन

अत्यंत मानाची आणि तितकीच अवघड असलेल्या या परीक्षेत पहिल्या दहात क्रमांक मिळविणे खूप कठीण होते. माझ्या या यशाचे श्रेय गिरी सर गुरुकुल क्लासेस आणि माझ्या पालकांना आहे. मी नववीत असताना गुरुकुल फाऊंडेशन कोर्सला प्रवेश घेतला. सुरुवातीच्या काळात त्यांनी माझ्यातील गुण हेरले व मला तेव्हापासूनचे या परीक्षेच्या तयारीला मार्गस्थ केले. अभ्यासाचे सूक्ष्म नियोजन, वेळेच्या वेळी दिलेला अभ्यास पूर्ण करणे, सर्वच विषयांचे शेवटच्या टप्प्यातील बहुमूल्य मार्गदर्शन एवढेच नव्हे तर माझा दिनक्रम व आहार याचेसुद्धा नियोजन त्यांनी केले. यामुळे मी तणावमुक्त राहू शकलो. याशिवाय माझ्या पालकांनीही वेळोवेळी माझे मनोधैर्य वाढवले. मला शांत व एकाग्र होण्यासाठी प्रोत्साहित केले. यातुनच माझा गुणाणुक्रम वाढत गेला.

**- ओंकार देशपांडे**, एआयआर रँक-८

## आत्मविश्वास वाढवला

मला आयआयटीत प्रवेश मिळावा हे माझ्या पालकांचे स्वप्न पूर्ण झाले आहे. माझ्या पालकांचा त्याग व प्रदीप गिरी सरांचे मार्गदर्शन यामुळे हे शक्य झाले. सरांनी वैयक्तिक लक्ष देत कायम माझ्या शकांचे निरसन केले. याशिवाय परीक्षेच्या काळात सरांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे अभ्यासात कसलीच अडचण राहिली नाही. यामुळे माझा आत्मविश्वास वाढला व मला हे यश मिळाले.

**-मिहिर जेवळीकर**, एआयआर रँक- १६२

## प्रेरणा स्रोत



ओंकारच्या या यशात सर्वात जास्त वाटा आहे तो प्रदीप गिरी यांचा. अध्यापनाच्या पुढे जात त्यांनी ओंकारकडे वैयक्तिक लक्ष दिले. नववीपासूनच त्याचे आयआयटीएन्स बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्याला सतत प्रोत्साहित केले. ओंकारमधील हुशारी ओळखून त्यांनी त्याची प्रयत्नपूर्वक तयारी करून घेतली. वेळोवेळी दिलेल्या त्याच्या सूचना अमलात आणल्या. यामुळेच आज हे यश त्याला मिळाले आहे. गिरी सरांच्या प्रेरणेशिवाय हे शक्य नव्हते.

**- डॉ. माणिक व विशाखा देशपांडे**
(ओंकारचे पालक)

## शेतकऱ्यांचा अंधकार दूर होणार



शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत निवासी शिकवणी या गुरुकुलच्या अनोख्या उपक्रमाने शेतकऱ्यांच्या घरातला अंधकार दूर होणार आहे. नक्कीच काही काळानंतर गुरुकुल अशी दिवे जोडत दिवाळी साजरी करेल.

**- मकरंद अनासपुरे,** प्रसिद्ध अभिनेता

## शिक्षण व्यवस्थेत बदलाची नांदी केली



गुरुकुलने शिक्षण व्यवस्थेत बदलाची नांदी केली आहे. ही शिक्षण पद्धती काळाची गरज आहे. गुरुकुल क्लासेसच्या चांगल्या कामगिरीसाठी भरभरून शुभेच्छा.

**- अच्युत गोडबोले,** अभ्यासक

## 'निट'साठी तज्ज्ञ मार्गदर्शक

पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या आग्रहास्तव मागील वर्षीपासून मेडीकलच्या 'निट' या केंद्रीय परीक्षेचे तयारी वर्ग सुरु करण्यात आले आहेत. यासाठी विषयतज्ज्ञ म्हणून मृणालिणी गंगाखेडकर व अवनी देवळ्नकर या संचालिका निट विभागाचे काम पाहत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आपण आपल्या आपल्या पाल्याचा मेडीकल प्रवेश सुलभ करण्यास प्राधान्यक्रम द्यावा.



मृणालिणी गंगाखेडकर अवनी देवळ्नकर

गुरुकुल क्लासेस | IIT-NEET & Foundation Division | पहिला मजला, सारडा आर्केड, सिंडिकेट बँकेच्या वर, स्टेशन रोड, पदमपुरा, औरंगाबाद | गुरुकुल क्लासेस, बीड बायपास, देवळाई चौक | 9764296651, 8237355968